## जाहीर नोटीस

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या
( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खलीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे वाकड येथील स.नं. १०६/५ पैकी,** मधील श्री. एकनाथ नामदेव वाकडकर यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील २४ मी. व १८ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र ११६३.१० चौ. मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

**मौजे वाकड येथील स.नं. १०६/५ पैकी,** मधील २४ मी. व १८ मी. रस्त्याची चतु:सिमा : (बाधित क्षेत्र ११६३.१० चौ.मी.)

पुर्वेस – लागू रस्ता
पश्चिमेस – लागू **स.नं. १०६ पैकीची मिळकत**
दक्षिणेस – लागू **स.नं. १०५ व १०६ पैकीची मिळकत**
उत्तरेस – लागू **स.नं. १०७ व १०६ पैकीची मिळकत**

परिशिष्ट २) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे वाकड येथील स.नं. १०८/३/१ अ पै.,** मधील श्री. एकनाथ नामदेव वाकडकर यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील २४ मी. रस्त्याने बाधित क्षेत्र १०५७.७५ चौ. मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे वाकड येथील स.नं. १०८/३/१ अ पै. मधील २४ मी. रस्त्याची चतु:सिमा : (बाधित क्षेत्र १०५७.७५ चौ.मी.)

पुर्वेस – लागू स.नं. १०८ पैकीची उर्वरित मिळकत
पश्चिमेस – लागू स.नं. १०८ पैकीची मिळकत
दक्षिणेस – लागू स.नं. १०८ पैकीची मिळकत
उत्तरेस – लागू स.नं. १०८ पैकीची मिळकत

परिशिष्ट ३) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे च-होली** येथील **स.नं. १९३/३ पैकी,** मधील श्री. पुंडलिक मारूती रासकर व इतर ९ यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचे मंजूर विकास योजनेतील २४.०० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र ९६४.६४ चौ. मी. जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे च-होली येथील **स.नं. १९३/३ पैकी** , २४ मी. रस्त्याची चतु:सिमा : (बाधित क्षेत्र ९६४.६४ चौ.मी.)
उत्तरेस –स.नं. २२७ ची मिळकत
पुर्वेस –स.नं. १९३ पैकीची मिळकत
दक्षिणेस –स.नं. १९३ पैकीची मिळकत
पश्चिमेस –स.नं. १९३ पैकीची मिळकत

परिशिष्ट ४) - मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे मोशी** येथील **गट नं. २९२ पै ( जूना गट नं. २८९ पै) मधील जितेंद्र पनराज सोनिगरा** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी रस्ता या प्रस्तावाने बाधित होणारे क्षेत्र ६३८.०० चौ.मी.,जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

चतु:सिमा : -

मौजे मोशी येथील गट नं. **२९२ पै ( जूना गट नं. २८९ पै)** ३०.०० मी रस्ता चतु:सिमा : (एकूण बाधित क्षेत्र ६३८.०० चौ.मी.)

उत्तरेस – जुना गट नं. २९० पै. ची मिळकत
पुर्वेस – गट नं. २९२ ( जूना गट नं. २८९ )ची मिळकत
दक्षिणेस – जुना गट नं. २७१,२७२ ची मिळकत
पश्चिमेस – गट नं. २९२ ( जूना गट नं. २८९ )ची मिळकत

परिशिष्ट ५)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे चऱ्होली येथील स.नं. ३३४ पै/१ ते ४ (जुना स.नं. ३७० पै) व ३२४/३ व ४ पै (जुना स.नं. ३५८ पै) मधील श्री. सुरेश व्दारकादास जुमानी** यांचे मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील** ९० मी. रस्त्याने बाधित व ३० मी. रस्त्याने बाधित एकुण क्षेत्र **१०३६० चौ.मी** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

**मौजे च-होली स.नं. ३३४/१ ते ४ पै (जुना स.नं. ३७० पै) व ३२४/३ व ४ पै (जुना स.नं. ३५८ पै) मधील मंजूर विकास योजनेतील ९० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र**
**चतु:सिमा-**

उत्तरेस :- स.नं. ३३३ पैकीची मिळकत

दक्षिणेस :- स.नं. ३२४ पै व ३३४ पैकीची मिळकत

पुर्वेस :- स.नं. ३३४ पैकीची मिळकत

पश्चिमेस :- स.नं. ३३४ पैकीची मिळकत

**मौजे च-होली स.नं. ३२४/३ व ४ पै (जुना स.नं. ३५८ पै) मधील मंजूर विकास योजनेतील ३० मी. रस्त्याने बाधित क्षेत्र**

उत्तरेस :- स.नं. ३२४ पैकीची मिळकत
पुर्वेस :- लागू रस्ता
दक्षिणेस :- स.नं. ३२४ पैकीची मिळकत
पश्चिमेस :- स.नं. ३२४ पैकीची मिळकत

जाहिरात क्रमांक १०२७
दिनांक १७/१२/१७

(signature)
उपसंचालक,
नगररचना व विकास विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे ४११०१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.